नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २२/०३/२०२२ (मंगळवार)**

**(दुपार)**

---

## घरफोडी

**पो.स्टे. बोरी** :– अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील मौजा रेल्वे कॉलनी बुटीबोरी ता.जि.नागपुर येथे दिनांक २०/०३/२०२२ चे २२.३० वा. ते दिनांक २१/०३/२०२२ चे ०७.०० वा. चे सुमारास फिर्यादी नामे– सौ. रूपाली क्रिश्णा केचे वय ३९ वर्ष रा. रेल्वे कॉलनी बुटीबोरी ता.जि. नागपुर हे बाहेर गावी कामानिमित्य गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने त्यांचे घराचे समोरील दाराचा कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने घरातील दोन लोखंडी आलमारीत लॉकर मध्ये ठेवलेले जुने वापरते सोन्या–चांदिचे दागीने एकुण कि. ५१,०००/–रू. व नगदी १,०००/–रू. असा एकुण कि. ५२,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार टेकाम पोस्टे बुटीबोरी मो नं ९०७५०२१४९१ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. बोरी** :– अंतर्गत एमआयडीसी बुटीबोरी चौक ते नंदोरी (चंद्रपुर रोड) येथे दिनांक १६.०३.२०२२ चे १७.४५ वा. ते १८.३१ वा. चे सुमारास फिर्यादी नामे– अरूण गजानन मोहारे वय ५० वर्ष रा. अथर्वे अपार्टमेन्ट, शिक्षक कॉलनी ब्राम्हणी, ता.बल्लारपुर जि.चंद्रपुर हे त्यांची पत्नी सौ.वैशाली अरूण मोहारे व त्यांचे मुलासह नागपुर येथे मुलाचे बारावीचे जेईई कोचींग क्लासेस करिता वस्तीगृहामध्ये रूम बुक करण्याकरिता नागपुरला गेले व मुलाचे कोचींग क्लासेस सबंधाने कामेपुर्ण करून व त्याची नादुरूस्त कार बुटीबोरी येथे असल्याने ती चंद्रपुर येथे घेवुन जाणे करिता नागपुर येथुन बुटीबोरी येथे परिवारासह ट्रॅव्हल्स बसने येवुन नादुरूस्त कार न मिळाल्याने फिर्यादी हे त्याची पत्नी व दोन मुलासह एमआयडीसी चौक बोरी येथुन गणराज ट्रॅव्हल्स बस मध्ये बल्लारपुर (चंद्रपुर) येथे जाणे करिता बसुन प्रवास करित होते. त्यादरम्यान नंदोरी जवळपास फिर्यादीचे पत्नीने तिचे हातामधील फिक्कट गुलाबी रंगाचे हॅन्डबॅगचे आत लहान पांढ–रा रंगाचे काळे ठिपके असलेल्या पर्समध्ये सोन्याचे दागीने एकुण किमती ३,५५,०००/–रूपये चा मुद्देमाल ठेवला असता अज्ञात आरोपीने लहान पर्ससह चोरी करून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री राकेश साखरकर मो.नं. ७३५०९०२१०० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**